My Marathi Kavita

# माझी कविता

डॉ. वि. प्र. तिकोणे

PDF processed with CutePDF evaluation edition www.CutePDF.com

At the lotus feet of Sadguru shri shri swami Madhavananad (Dr.Madhav Nagarkar) .

Dr.Vikrant Tikone



स्वामी माधवनाथास.

सत्संगी आपल्या बोध पावतो
साधकवित्ती रममान होतो
जाणले जाणले मनी गमतो
नकळे कधी हरवून जातो।
उपाधि मध्ये अडकून पडता
ध्याना नामासी विन्मुख होता
आपल्या पायांशी शरण येतो
धरून हात मार्गी न्या आता।

हर्ष शोकाच्या पल्याड
गाव आनंदाचे आहे.
जो नेईल तिकडे
कोण माहितगार आहे।।
कथा तिथल्या लोकांची
ग्रंथ गाण्यात आटली.
सांगा कुणीतरी कुणी
तेथे जाउनिया आली।।
देह उपचार जिथे
मन राहते न राहते
निष्ठा संपूनी सर्व
ज्ञान प्रकाशी दिसते ।।
(मज वाटते आपुले...)
माझे सर्वस्व देऊळ
त्या गावातच आहे.
त्या गावाची पण
मी वाट विसरले आहे ।।

जाने. २०००
वि. प्र. तिकोणे

हे जादुगारा,
एक जमुरा मी तुझा।
एक जमुरा रे!
तुझ्याच प्रश्ना तुझेच उत्तर
पण मी देतो रे।
चादरी खाली स्वतःस लपवून
हजरजबाबी उत्तर होवून
जगा रिझवतो रे।
तूच शिकविले तयार केले
तुलाच ठकवून परी
मी टाळ्या घेतो रे।
या दुनियेच्या बाजारात
माझ्या सकरन जाणे मी
मन भाझे काही रे।

— x — x — x —

— x — x — x — x —

day

जीवनाचा स्पर्श जगण्याला
व्हावा म्हणून
केलेले सारे प्रयत्न
व्यर्थ जात आहेत अजून
प्रयत्नांच्या अट्टाहासाने
असेले कदाचित पण
जीवन ~~अजून~~ दृष्टीपथात
येत नाही अजून.

जमविले विपुल ग्रंथ आजवर
न्यहल्या त्या ग्रंथी नाही उपचार ।
करतो पारायण शब्दात वणवणा
गवसेना अर्थ वाटे अभिमान ।
घेतले सुख भाषा सौंदर्यात
परी वाटे आत रितं रितं ।

—x—

— × —

शोषाचे बीज ठणकतय आत
जीवनाच्या। कृपेची वाट पाहत
ओढली माती पडले ओठात
पराकाष्ठा केली जेवढी हातात.

— × —

वि. ए. निको

पुढे चालू

हो कृपेची यामीनी शतखंड मज करुनी
हे अस्तित्व मिटूनी सुटे जगण्यातील बोचणी
न जगण्याची आसक्ती न मरणाची भिती
सल एकच उरात न मिळाली तव प्रीती ॥

कसे तुजला भेटावे काहीच कळेना
जन्म व्यर्थ वाहतो थांबलो घडेना
हि वार जन्मांतरीची की आताच चालायची
स्फुरेना कोठे काही. व्यथा आली निरर्थकाची ॥
तुला मानले देव रूप ओतले सगुणी
वाहूनिया फुले ही श्रद्धा नम्र ये कुढुनी
सांगतात सत्य हात उभारुनी कुणी
मानावे कसे जे न ये डोळा दिसुनी ॥
हा दाह अंतरात का जळे दिनरात
हा शोध दशदिशात का घडे सदोदीत
मी रंगतो सुखाच्या कित्येक सोहळ्यात
त्या भोगण्यात परी तळमळे अंतरात ॥
ग्रंथ वाचले अपार माथी बांधला भार
ज्योत पेटलीच नाही तेल ओतले अपार
जाता संताना शरण आड येतसे अभिमान
मूर्ख भजावे म्हणता ।भिते चरकांना मन ॥
हि आस पूर्णत्वाची कोणा कशी कळावी
घडे टवाळीच घरी दारीही फजिती व्हावी
त्याग तोही घडेना भोग तोही सकेना
अंतरी बाहेरी अशी घडे माझी दैना ॥
हि कथा सांगतांना ये व्यथाच बाहेरी
होतो शरणागत परी दिसे तेही अहंकारी
यत्न सारेच खुंटले मार्ग सारेच अंधारी
वळुनी अंतरी मी पुन्हा तुझ्याच दारी ॥

वासनेच्या पैल ने रे
कर भवबंध सैल रे ।
पाहीली वाट बहू
आता नाही धीर रे ॥
शिणली काया बहू
नको करू उशीर रे ।
अंतरात आग माझ्या
जीव (प्राण) झाला अधीर रे ।

विक्रांत

येता येता अर्थ हातात
हरवून जात आहे.
जाणाऱ्या जाणाऱ्याला
घालवून देत आहे.
हे शब्द होवून प्रकाश
उजेड दाखवित आहे.
मी घेवून मशाल हाती
वाट पहाटेची पाहत आहे.

12 Sunday

नाकारण्यात तुला
माझा कधीच नकार नसतो
रुसणे प्रियेचे
प्रीतीचा आविष्कार असतो ॥

ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी
कुशावर्त तीर्थापाशी
जागा म्हणून निवडली
दान देण्यास भक्ती ।
कुणी कालसर्प करती
कुणी नागबली यजती
रत्ने देतोच निवृत्ती
जन माती घेऊन जाती ।
त्याच्या कृपाकराप्राने
पार लाख जीवनमरणे
या जीवनातील भितीने
का घर मरजीचे मरणे ।
मरता कैवल्य जीवनी
दिली कुडी झुगारुनी
त्यांच्या समोर केविलवाणी
ती गर्भगर्भात जगामी ।
दिसे अलिप्त शांत
साध्यासुध्या मंदिरात
वाट भक्तांची पाहत
मुक्ती घेऊन हातात ।
धावा धावा निघ
करा सर्वस्व अर्पित
होना प्रसन्न हे नाथ
शंकर ठेवीन माथी हात ।

सुनउ

माउलीचे गुरु निवृत्तीनाथ ।।
तया माझा नमस्कार वारंवार ।। ध्रु ।।
माउली निर्झर निवृत्ती पहाड ।।
जना साठी दिले फोडून अंतर ।। १ ।।
माउली मोगरा निवृत्ती काड
वाढला वेल त्याच्या खांद्यावर ।। २ ।।
माउली चांदणं निवृत्ती आकाश
विराजित सौंदर्य त्याच्या अंकावर ।। ३ ।।
माउली लावण्य निवृत्ती नरवण
वाटविले सुख अपरंपार ।। ४ ।।
माउली हिरा निवृत्ती कारागिर
केले उपकार अति जगावर ।। ५ ।।

वि. गोंधे    जून ०७

निवृत्तीजवळी बसलो काही काळ
निवला जाळ । अंतरीचा
हरिपाठाचे अभंग वीणेकरी गात
अर्थ नवा आत । होता उमलत
समाधी दर्शन स्पर्श भेरणं
झाली संपुर्ण । तीर्थयात्रा
पावला शंकर । श्री त्र्यंबकेश्वर
घालूनी पायावर । नाथांच्या

वि. प्र. तिकोणे जून ०७

कोण कुठला शिष्य हा
गुरुस माहीत नाही.
गुरुचे ही पूर्वायुष्य
शिष्यास ठाऊक नाही.।
एक प्रसन्नतो रुबाबदार
सहजतेने होती वावरत
एक नम्रता विवेकावर
पायी लोटांगण घालत।
अहेतुक आणि निर्मळ
डोळ्यामध्ये होती कळकळ
काय घडले न कळले.
पण हृदय भरुन गेलं।

वि.प्र.तिकोणे · जून ०२

या वर्षी पाउस
कृपा घेवून आला
भिजवून गुरुकृपेने
चिंब करून गेला ।।
या कृपेला अनुग्रहाला
कलावती आई साक्षीला
ज्ञानदेवही न चुकता
आले आशिष द्यायला ।।
वदले मज ही गुरुदेव
ॐ तत्वम सोऽहं सः
मंग ऐकताच हा
जीव शांत शांत झाला ।।

जून ०३

तुझ्यावाचून जरी
तुझ्या स्मृतीत जगणे
तू न भेटला तरी
तुला आठवत मरणे
हेच आहे माझ्या
जीवनाचे गाणे
याचाचून दुजे
शब्द न काही करणे

—×—

मला ठेव लक्षात
उभा जन्मभर जळत
फुंकर घालायला तरी
निदान येऊन भेट

—×—

सखा माझा गुरुदेव
माझ्या जवळी येवुनी
मज गेलासे सांगुनी
तुज ब्रह्म असुनि
तोच तो रहा स्मरुनि ॥
बसलो ~~श्री~~ कबुल करुनि
परी येईना ते घडुनि
मग काकुळतीस येवुनि
धावा करुनी म्हणुनि
पायी लागलो विनवुनि ॥
गुरु वदले हसुनि
अरे ~~केवल~~ अभ्यासावाचुनि
न ये काही घडुनि
बीज हे दिले पेरुनि
निश्चित येईल उगवुनि ॥
पाणि श्रद्धेने देवुनि
सांभाळ कुंपण घालूनि
आधी सोसाळ जपुनि
शब्द सांत्वना ऐकुनि
विज्ञान झाला समाधानि

जुलै. वि.दे

न कळे काय ते वदले
न कळे काय मी ऐकले
ऐकता ऐकता पण
जग झाले वेगळे।
शब्दात अर्थ भिनले
स्पर्शात बोल कळले
हृदय थरकून भासे
अस्तित्व नवे हे झाले।
ते अँग उच्चारण
होते जणू संजीवन
आले अँतरंग उघडून
माझ्या साठी पुन: जीवन।

डॉ. मोहन जुठे

विसरलेली जुनी आठवण
आली समोर सजीव होऊन ।
अन माझ्या काळजामधून
स्फुरण उभरली सोहं धुन । (ऊ

आता कोण असे मी अन
आलो असे कुठून ।
उभरतात प्रश्न आतून
आले क्षणात उत्तर उभरून ।
सोहं सोहं सोहं सोहं
प्राणा मधून श्वासा मधून ।

जुलै 21 (ऊ

21 Sunday

शांत होता एकांत
निखतेल्या कुडरात
निस्तब्ध खग
निश्चल वात
विचार तरंग
नव्हता मनात.
मीपण गेले
खोल खोल आत.
श्वासही संथ
झाला शांत.
असून मी माझ्यात
नसात. पाहात.
मीपण फक्त
उरले होत.
आरंभ मध्य
त्या नव्हता अंत.
मिग गोग त्या.
नव्हते भान.
तुडुंब भरलो.
होतो विश्वात!

—×—

असं क्वचित होतं.
वर्ष सहा महिन्यात
न मागता येतं.

स्वरूपानंदा पाहीले स्वप्नी
सजीव मुर्ती ती साजीरवाणी
स्मरण करता अवतीर्ण होवूनी
दिले दर्शन कृपा करुनि ।
केले नमन होवून लीन
अनुभवेही केले कथन
वदले स्वामी काही लिहून
ते नच स्मरते जाग येवून ।
दर्शनाची त्या आस मनात
काही केल्या नव्हती जात
आज जाहली सहज शांत
रखुष मिळाली अन आत ।

पुन्हा पुन्हा बीज
घालतोय रुजू
पुन्हा पुन्हा अंकुर
लागतोय सुकू ।।
अडाणी कुणबी मी
आळशी जणू
व्यर्थ मशागत
कुठवर शिणू ।।
कळेना प्रमाण
येईना अनुमान
बिन्या वावरात
आहे मी अजून ।।

सत्याच्या शोधात
जन्म सारा गेला
लागले न काही हाती
शोधण्यात जीव रंगला ।।
एकेक ओवीत ज्ञानेशाच्या
रमला झाला सोहळा
अर्थात उपनिषदांच्या
जीवनच हरखून गेला ।।
चरित्र ग्रंथा मधूनि
भेटला संत योगियांना
त्र्यंबक संत योगी
जीवलग होऊन गेला ।।
मिळो न मिळो ध्येय
चालल्या अर्थ मिळाला

वि. प्र. [illegible]

एक विनंती प्रभू निश्चिती
असू दे चित्ती समाधान
फळाशेवीण व्हावी कृती
साधावी वृत्ती सदा प्रसन्न
जगरहाटी जांन तरून जाती
जडो सदा ती भक्ती मन
देवासाठी मनी भरावी प्रीती
व्हावे मन दारी वैराग्याची
ज्ञानाच्या उजेडी हरोत रुपडी
माया बापुडी कायमची
ज्ञानोबाच्या पायी मारली मिठी
न व्हावी सुटी कधीकाळी

जून ०३